सामना | शेवटचं पान मुंबई, बुधवार, दि. २ फेब्रुवारी २०११




# आदर्श घरासाठी

**आपण** ज्या घरात राहातो, त्याचा आपल्या जीवनावर आणि प्रकृतीवर खरोखरच परिणाम होतो का? वास्तुशास्त्र या संकल्पनेत तथ्य आहे का? असे असंख्य प्रश्न सर्वसामान्यांना नेहमी पडत असतात. वास्तुशास्त्रातील तज्ज्ञ माणसं नेहमी खरीच माहिती देतील यावरही आपला विश्वास नसतो. परंतु, डॉ. तुषार सावडावकर यांनी 'वास्तुशास्त्र आणि ज्योतिषशास्त्र' या विषयावर पीएचडी केली आहे. या विषयातील सखोल माहिती त्यांनी पुस्तक रुपाने प्रकाशित केली आहे. वास्तुशास्त्राबाबतच्या सर्व शंकांची पूर्तता होऊ शकेल असे 'आदर्श घराची संकल्पना' हे पुस्तक अनुसुया पब्लिकेशनतर्फे नुकतेच प्रकाशित झाले आहे.

हिंदुस्थानी शास्त्रानुसार जीवन व दीर्घायुष्य यांचा संबंध वास्तुशास्त्राशी आहे. निसर्गोपचार व आयुर्वेद जसे मानवी शरीराचे संतुलन राखते तसेच वास्तुशास्त्र जागेतील ऋणात्मक ऊर्जा काढून त्या जागेचे संतुलन राखून त्या वास्तूतील सकारात्मक ऊर्जेमध्ये वाढ करते. सावडावकर यांनी पुस्तकात एका विशेष कॅमेऱ्याद्वारे काढलेल्या छायाचित्रांतून हे स्पष्ट केले आहे.

वास्तुशास्त्रामध्ये रंगाला अतिशय महत्त्व देण्यात आलेले आहे. प्रत्येक रंगाचा मानवाच्या शरीरावर, मनावर, बुद्धीवर, आध्यात्मिक जीवन साधनेवर सतत परिणाम होत असतो. योग्य रंगाचा वापर केल्यास वास्तुमधील दोष बऱ्याच प्रकारे कमी करू शकतो. हे सांगणारा रंगशास्त्र आणि वास्तू हा विषय यात हाताळण्यात आला आहे. जमिनीची खरेदी करताना ती वास्तुशास्त्राप्रमाणे असणे अतिशय गरजेचे आहे. त्या जमिनीचा आकार, उतार, त्याच्या आजूबाजूला असलेल्या जागा, जमिनीचे क्षेत्रफळ हे वास्तुशास्त्राच्या नियमानुसार असणे अत्यंत आवश्यक आहे. याविषयी जमिनीची खरेदी हा भाग विस्तृतपणे या पुस्तकात देण्यात आला आहे.

या व्यतिरिक्त या पुस्तकात शुभ व अशुभ जागा, मुख्य दरवाजा, जमिनीवरच्या लाद्या, क्रिस्टल थेरपी, पिरॅमिड, मॅजिक हवन, वेगवेगळ्या दिशेला असलेल्या घरांचे परिणाम असे विविध विषय हाताळण्यात आले आहेत. तसेच यात वैज्ञानिक पद्धतीने रत्नथेरपी, धातू अध्याय, आय.एस.आय.एस. या आधुनिक तंत्रज्ञानाने काढलेले फोटोग्राफ हे अतिशय उल्लेखनीय तसेच वाचनीय आहे. या पुस्तकाच्या माध्यमातून आपण स्वतःचे घर कसे बांधावे याचा संपूर्ण आराखडा त्यांनी आपल्यासमोर ठेवला आहे.

e-mail : tusharvastuexperts@yahoo.com